# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिति
## कार्यपत्रिका क्रमांक - १७०
## सभावृत्तांत

दिनांक- २५.०५.२०१० वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक २५.०५.२०१० रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
३. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
४. मा.रामदास तानाजी कुंभार
५. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
६. मा.सौ.सुलोचना बबन बढे
७. मा.सुमनताई मधुकर पवळे
८. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
९. मा.थोरात एकनाथ दादा
१०.मा.तानाजी विठ्ठल खाडे
११.मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबु नायर
१२.मा.गावडे जयश्री वसंत
१३.मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त,मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.सावंत,मा.झुरे, मा.गायकवाड,मा.पवार,मा.मुंढे,मा.गावडे,मा.भोसेकर,मा.कारचे-सहा.आयुक्त, मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक,मा.काळे-नगरसचिव,मा.उगिले-शहर अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता, मा.पाटील-उपसंचालक(नगररचना),मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.हरिभारती-प्रशा.अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.जाधव, मा.कुदळे, मा.थोरात,मा.इंगळे,मा.बनकर,मा.ढगे,मा.साळवी,मा.दुधेकर,मा.निकम,मा.चव्हाण, मा.पाटील, मा.कांबळे, मा.कुदळे-कार्य.अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.माछरे-विशेष अधिकारी, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-</u>

विषय क्रमांक- ३७) निगडी गांवठाण व परीसरातील छोट्या वाहतुक व्यावसायिकांचे वाहनतळाचे व्यवस्थेबाबत-मा.राजेंद्र साळुंके,मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३८) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१०९०३ दि.३०/३/१० मध्ये दुरुस्ती करणेबाबत-मा.राजेंद्र साळुंके,मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक - ३९) कार्यक्रमासाठी खरेदी केलेला चांदीचा कलश याचे बील अदा करणेबाबत - मा.प्रेमकुमार नायर,मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक - ४०) तैलचित्रे बसविणेबाबत - मा.प्रेमकुमार नायर,मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक - ४१) मा.स्थायी समिती ठ.क्र.८८१ रद्द करणेबाबत - मा.राजेंद्र साळुंके,मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक - ४२) तरतूद वर्गीकरणाबाबत - मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक - ४३) राष्ट्रीय कार्यक्रमांसाठी घेतलेल्या वाहनांचे भाडेदराबाबत - मा.राजेंद्र साळुंके,मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक - ४४) कासारवाडी उर्दू प्राथमिक शाळेच्या वर्गखोल्या खाजगी उर्दू माध्यमिक विद्यालयास भाड्याने देणेबाबत - मा.तानाजी खाडे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

---------------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक :- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक :- मा.एकनाथ थोरात

मनपा नगरसदस्य श्री.राजू मिसाळ यांच्या मातोश्री श्रीमती इंदूबाई दत्ताराम मिसाळ यांचे तसेच नगरसदस्य श्री.सुरदास गायकवाड यांचे बंधू मोहनदास तुकाराम गायकवाड यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना तसेच मेंगलोर येथील विमान अपघातात मृत झालेल्या व्यक्तींस श्रध्दांजली वाहून दि.२५.०५.२०१० रोजी दुपारी ४:०० पर्यंत सभा तहकुब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

---------------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.)

मा.सभापती :- दि.२५.०५.२०१० रोजी दुपारी ४.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १७०
सभावृत्तांत
(दि.२५.०५.१० [दुपारी ३.०० वा.] ची तहकुब सभा)

दिनांक- २५.०५.२०१० वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची मंगळवार दिनांक २५.०५.२०१० [दुपारी ३.००] ची तहकूब सभा दि.२५.५.२०१० रोजी दु.४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
३. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
४. मा.रामदास तानाजी कुंभार
५. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
६. मा.सौ.सुलोचना बबन बढे
७. मा.सुमनताई मधुकर पवळे
८. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
९. मा.थोरात एकनाथ दादा
१०.मा.तानाजी विठ्ठल खाडे
११.मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबु नायर
१२.मा.गावडे जयश्री वसंत
१३.मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त,मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.सावंत,मा.झुरे, मा.गायकवाड,मा.पवार,मा.मुंढे,मा.गावडे,मा.भोसेकर,मा.कारचे-सहा.आयुक्त, मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक,मा.काळे-नगरसचिव,मा.उगिले-शहर अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता, मा.पाटील-उपसंचालक(नगररचना),मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.हरिभारती-प्रशा.अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.जाधव, मा.कुदळे, मा.थोरात,मा.इंगळे,मा.बनकर,मा.ढगे,मा.साळवी,मा.दुधेकर,मा.निकम,मा.चव्हाण, मा.पाटील, मा.कांबळे, मा.कुदळे-कार्य.अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.माछरे-विशेष अधिकारी, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

मा.राजेंद्र साळुंके :- मा.स्थायी समिती सभा दिनांक १३.५.२०१० ठराव क्र.११०९६ मध्ये "मान्यता देणेची मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली असली तरी त्यामधील मोरवाडी उद्यानाव्यतिरिक्तची अन्य उद्याने मा.आयुक्त यांच्या प्रस्तावाप्रमाणेच्या कालावधीसाठी व मोरवाडी उद्यान तीन महिन्याच्या कालावधीसाठी देखभाल,विकास व संरक्षण करणेकामी मे.निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस पुणे यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस" हा मजकूर वगळण्याची दुरुस्ती करणेत यावी.

अ] मा.स्थायी समिती सभा दिनांक १३.५.२०१० ठराव क्र.११०९६ मध्ये "मान्यता देणेची मागणी मा.आयुक्त यांजकडुन करणेत आली असली तरी त्यामधील मोरवाडी उद्यानाव्यतिरिक्तची अन्य उद्याने मा.आयुक्त यांच्या प्रस्तावाप्रमाणेच्या कालावधीसाठी व मोरवाडी उद्यान तीन महिन्याच्या कालावधीसाठी देखभाल,विकास व संरक्षण करणेकामी मे.निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस पुणे यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस" हा मजकूर वगळण्याची दुरुस्ती करणेत आल्याचे व या दुरुस्तीसह दिनांक ११.५.२०१० व १३.५.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

मा.राजेंद्र साळुंके :- मा.स्थायी समिती सभा दिनांक १८.५.२०१० ठ.क्र.१११६२ मध्ये "उपहारगृह या प्रयोजनासाठी" या मजकूरानंतर "श्री धनाजी खाडे यांस" हा मजकूर तसेच "११ महिने" हा मजकूर वगळून त्याऐवजी "५ वर्षे" हा मजकूर समाविष्ट करणेची दुरुस्ती करणेत यावी.

ब] मा.स्थायी समिती सभा दिनांक १८.५.२०१० ठ.क्र.१११६२ मध्ये "उपहारगृह या प्रयोजनासाठी" या मजकूरानंतर "श्री धनाजी खाडे यांस" हा मजकूर तसेच "११ महिने" हा मजकूर वगळून त्याऐवजी "५ वर्षे" हा मजकूर समाविष्ट करणेची दुरुस्ती करणेत आल्याचे व त्या दुरुस्त्यांसह दिनांक १८.५.२०१० रोजी [दु.४:०० व ४:०५] झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------------------

ठराव क्रमांक-१११७४ विषय क्रमांक- १
दिनांक- २५.०५.२०१० विभाग-प्रशासन
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/४५६/१० दि.१३/०४/२०१०
विषय- श्री.अजय जनार्दन सुर्यवंशी यांना कायदा सल्लागार या पदावर ६ महिने कालावधीसाठी हंगामी स्वरुपात मानधनावर नियुक्ती देण्याबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११७५ विषय क्रमांक- २
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१३१/१० दि.२६/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.१३९ अन्वये, वॉर्ड क्र.५८ रावेत येथे पवना नदी काठी घाट बांधणे (फेरनिविदा) कामी मे.आर.आर.पाटील (नि.र.रू. २८,००,२४४/- [र.रू.अठ्ठावीस लाख दोनशे चव्वेचाळीस] पेक्षा १८.०० % जास्त) (सन २००८-०९ च्या चालू दराशी तुलना करता १७.७९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू.३३,०४,२८८/- [र.रू.तेहतीस लाख चार हजार दोनशे अठ्ठ्याऐंशी] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १० % पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११७६ विषय क्रमांक- ३
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- संगणक
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/९/कावि/४९४/१० दि.२६/४/१०
विषय - पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य कार्यालयातील विविध विभागांसाठी ISM Office NT ५० Users Upgrade करणेबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११७७ विषय क्रमांक- ४
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- क्रीडा
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/ग्रं/कावि/६४०/०९ दि.१८/११/०९
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४०
विषय - मनपा जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता व

यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामाबाबत..

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११७८ विषय क्रमांक- ५
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- क्रीडा
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ-१) मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/४/कावि/२७१/१० दि.७/४/१०
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४१

म.न.पा.ची स्वा.सावरकर व्यायामशाळा निगडी (प्राधिकरण) सेवाशुल्क तत्वावर वनिता मंडळ, निगडी (प्राधिकरण) या संस्थेस चालविण्यास द्यावयाची की शरयूनगर प्रतिष्ठान प्राधिकरण या संस्थेस चालविण्यास द्यावयाची याबाबत फेरविचार करून शरयूनगर प्रतिष्ठान प्राधिकरण या संस्थेस चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११७९ विषय क्रमांक- ६
दिनांक- २५.०५.२०१०
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ- १) मा.गणेश भोंडवे,मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव..
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४२,
विषय :- व्यायामशाळा साहित्याची दुरुस्ती करणेबाबत..

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११८० विषय क्रमांक- ७
दिनांक- २५.०५.२०१०
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- १) मा.गणेश भोंडवे,मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव -
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४३ ,
विषय :- महापौर चषक जिल्हास्तरीय क्रिकेट व कराटे स्पर्धा आयोजित करणेबाबत..

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११८१ विषय क्रमांक- ८
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- ड प्रभाग
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/डमु/८३/१० दि.१०/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वतीने महाराष्ट्र दिन व संयुक्त महाराष्ट्राच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्त दि.२९/४/२०१० रोजी पिंपरीवाघेरे येथील यशवंतराव चव्हाण स्टेडीयमवर

मराठी तारका या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे साठी मोठे स्टेज, मेकअप रूम, फायबर खुर्च्या, मैदानामध्ये व स्टेजवर मॅटींग इ.व्यवस्था करणे [अपेक्षित खर्च र.रू.५,००,०००/-] कामी अशा प्रकारचे काम मे.सिध्दी एंटरप्रायजेस (नि.नो.क्र.१/१२७-२००८/०९) हे ०.१०% कमी दराने करीत असले तरी सदरच्या कामाची तातडी व काम वेळेत पुर्ण करणे या अटीसहीत त्याचदराने व अटी शर्तीने करण्यास मे.वधवा मंडप ॲण्ड कंपनी यांनी मान्यता दिलेली असून त्यामध्ये त्यांनी नियमाप्रमाणे सर्व्हिस टॅक्स १०.३० % व वॅट टॅक्स १.५० % अदा करणेस विनंती केलेली असल्याने उपरोक्त काम थेट पध्दतीने करणेच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११८२ विषय क्रमांक- ९
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१३८/१० दि.११/५/१०
विषय - निविदा नोटीस क्र.२०/१/२००९-१० मधील कामांचे करारनामे करणेस मंजूरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११८३ विषय क्रमांक- १०
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१३९/१० दि.११/५/१०
विषय - निविदा नोटीस क्र.२०/२/२००९-१० मधील कामांचे करारनामे करणेस मंजूरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक १०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११८४ विषय क्रमांक- ११
दिनांक- २५.०५.२०१०
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ-१) मा.शकुंतला धराडे, मा.ज्योती भारती यांचा प्रस्ताव...
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २९/३/२०१० ठराव क्र.२८
विषय - महिला बचतगट समता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत...

विषय क्रमांक ११चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११८५ विषय क्रमांक- १२
दिनांक- २५.०५.२०१०
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-१) मा.सुषमा गावडे, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव...
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २९/३/२०१० ठराव क्र.२९
विषय - महिलांना विविध व्यवसाय प्रशिक्षण देणेबाबत...

विषय क्रमांक १२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११८६ विषय क्रमांक- १३
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- लेखा
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/३/कावि/१४२/१० दि.१२/५/१०
विषय - पी.एम.पी.एम.एल. यांना वेतनासाठी अदा करावयाच्या रकमेबाबत...

विषय क्रमांक १३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११८७ विषय क्रमांक- १४
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/६९/१० दि.११/५/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.८/२००९/१० मधील अ.क्र.२ अन्वये, वॉर्ड क्र.६५, केशवनगर येथील वस्ताद बाळासो. गावडे जलतरण तलावावर जनरेटर (५० के.व्ही.ए.) बसविणेकामी मे.फ्लोमॅक इंजिनियरिंग कार्पो. (नि.र.रू. ९,३२,२४६/- [र.रू.नऊ लाख बत्तीस हजार दोनशे शेहचाळीस] पेक्षा २५.२० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११८८ विषय क्रमांक- १५
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/६७/१० दि.११/५/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.८/२००९/१० मधील अ.क्र.३ अन्वये, ब प्रभाग विद्युत दाहीनी लिंक रस्ता व प्राचार्य रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथील जनरेटरची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.भाग्यश्री इंटरप्रायईजेस (नि.र.रू.१,३९,९५६/- [र.रू.एक लाख एकोणचाळीस हजार नऊशे छपन्न] पेक्षा १८.१० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक-१११८९ विषय क्रमांक- १६
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/६६/१० दि.११/५/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.८/२००९/१० मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.६५, केशवनगर, चिंचवड येथील वस्ताद बाळासाो. गावडे जलतरण तलावाचे जलशुध्दीकरण यंत्रणेची दुरुस्ती करणेकामी मे.भाग्यश्री इंटरप्राईजेस (नि.र.रू. ५,९९,९०४/- [र.रू.पाच लाख नव्यान्नव हजार नऊशे चार] पेक्षा १८.१० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११९० विषय क्रमांक- १७
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/२१/१० दि.५/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.५/२००९/१० मधील अ.क्र.४ अन्वये, प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील ध्वनिक्षेपण यंत्रणेचे वार्षिक चालन देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.राज कार्पोरेशन (नि.र.रू.१,४९,८५२/- [र.रू.एक लाख एकोणपन्नास हजार आठशे बावन्न] पेक्षा ३ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११९१ विषय क्रमांक- १८
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/७/१८७/१० दि.१३/५/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.७/२००९-२०१० मधील अ.क्र.७ अन्वये, ब प्रभाग कार्यक्षेत्रातील नागरी वस्तीतून जाणारे आवश्यक ते नाले साफ करून नाल्यातील निघालेला गाळ वाहतूक करून मोशी डेपो येथे टाकणे व पसरविणेकामी मे.विपुल असोसिएट्स (नि.र.रू.२,८३,०४८/- [र.रू.दोन लाख त्र्याऐंशी हजार आठ्ठेचाळीस] पेक्षा ४२.५० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११९२ विषय क्रमांक- १९
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/७/१८६/१० दि.१३/५/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२००९-२०१० अन्वये, ब प्रभाग कार्यक्षेत्रातील राडारोडा उचलणे व वाहतुक करणेकामी मे.कूतवळ कन्स्ट्रक्शन (प्रति ट्रिप र.रू.४५९/-) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.
(नि.र.रू.२,०१,०००/- [र.रू. दोन लाख एक हजार])

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११९३ विषय क्रमांक- २०
दिनांक- २५.०५.२०१० विभाग-ब प्रभाग
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/बप्र/जा/३८०/१० दि.१४/५/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.५७ किवळे येथील विकासनगर मधील रस्त्यावर वॉर्डस्तरीय योजनेतुन दिवाबत्ती पोल उभे करणे व इतर कामे करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने विमलाई इलेक्ट्रीक कार्पो. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू.४९,९१६/- [र.रू.एकोणपन्नास हजार नऊशे सोळा] पेक्षा १.२ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-१११९४ विषय क्रमांक- २१
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/बप्र/-/३८१/१० दि.१४/५/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.६४ मधील नव्याने झालेल्या आरोग्य विभागाच्या कार्यालयाचे विद्युतीकरण करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने विमलाई इले.कार्पो. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू.४९,९६९/- [र.रू. एकोणपन्नास हजार नऊशे एकोणसत्तर] पेक्षा १.२ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११११९५ विषय क्रमांक- २२
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- उद्यान
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-मा.सहशहर अभियंता यांचे जा.क्र.५७/उद्यान/वि/१० दि.१४/५/१०

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाची मो.जा.क्र.४३ एस ब्लॉक, भोसरी, पुणे-२६. येथील विकसीत करावयाचे उद्यानात सिंगल फेज विजमीटर घेणेकामी म.रा.वि.वि.कं.म.यांस र.रू.२,१२१/- [र.रू.दोन हजार एकशे एकवीस] अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११११९६ विषय क्रमांक- २३
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- नगररचना व विकास
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/४अ४/४४/१० दि.१३/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुद प्रमाणे टाईम्स ग्रुप कडील शुध्दीपत्रक व जाहीर नोटीसचे प्रसिध्द झालेल्या जाहीरातीचे एकूण बिल र.रू. १२,५४०/- [र.रू.बारा हजार पाचशे चाळीस] अदा करणे आवश्यक असलेने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११११९७ विषय क्रमांक- २४
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- नगरसचिव
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ-मा.नगरसचिव यांचे जा.क्र.नस/१/कावि/५२८/१० दि.१४/५/१०

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११११९८ विषय क्रमांक- २५
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- दूरसंचार
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/१४३/१० दि.१३/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जकात विभागाकरिता मोबाईल मॉडेल क्र.५०३० या प्रकारचा एक नवीन मोबाईल नोकीय कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.स्काय लिंक, चिंचवड यांचेकडून पूर्वस्विकृत दराप्रमाणे थेट पध्दतीने करारनामा न करता व निविदा न मागविता र.रू.२,५२५/- [र.रू. दोन हजार पाचशे पंचवीस] प्रमाणे खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११११९९ विषय क्रमांक- २६
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- भुमि आणि जिंदगी
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भुजिं/२/कावि/१०८/१० दि.१५/५/१०
विषय - से.नं.२४, संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल मधील उपहारगृह २ रा मजला २५ वर्षाच्या भाडेपट्ट्याने देणेबाबत...

मा.महापालिका सभेने विषयांकीत बाबीस मान्यता दिलेली असल्याने विषय क्रमांक २६ कामीचे मा.आयुक्त यांचे विषयपत्र मा.आयुक्त यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२०० विषय क्रमांक- २७
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- उद्यान
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/नि/१/८०/१० दि.११/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.७/२००९-१० अन्वये, मनपा परिसरातील वृक्षांचे मनपा हद्दीत पुर्नरोपण करणेकामी मे.साईकृपा सर्व्हिसेस (नि.र.रू.३९,७८,०००/- [र.रू. एकोणचाळीस लाख अठ्ठ्याहत्तर हजार] पेक्षा २०.९९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२०१ विषय क्रमांक- २८
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/निविदा/कावि/२७२/१० दि.१७/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

करसंकलन विभागाला आवश्यक असलेले मिळकत कर बिले छपाई करणेकामी मे.एस.एस.के.इंफोटेक प्रा.ली.यांचे लघुत्तम दर [एका नगासाठी ०=६९ पैसे] प्राप्त झाले असल्याने मे.एस.एस.के.इंफोटेक प्रा.ली., पुणे यांना मिळकत कर बिले छपाई करणेकामी एकूण र.रू.४,१४,४००/- [र.रू.चार लाख चौदा हजार चारशे] चा करारनामा (संविदा) करून पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने केलेल्या संविदेचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२०२ विषय क्रमांक- २९
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- बीओटी
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.काअ/बीओटी/कावि/२१/१० दि.१७/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे आरक्षित जागेवर बी.ओ.टी.तत्वावर विविध ठिकाणी प्रकल्प विकसित करणेकरिता विशेष जाहीरात वर्तमानपत्रा मध्ये प्रसिध्द करणेकामी आलेल्या र.रू.५,१६,०००/-[र.रू.पाच लाख सोळा हजार] खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२०३ विषय क्रमांक- ३०
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- बीओटी
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.काअ/बीओटी/कावि/२२/१० दि.१७/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे आरक्षित जागेवर बी.ओ.टी.तत्वावर विविध ठिकाणी प्रकल्प विकसित करणेकरिता विशेष जाहीरात वर्तमानपत्रा मध्ये प्रसिध्द करणेकामी आलेल्या र.रू.५,४८,१००/- [र.रू.पाच लाख आठ्ठेचाळीस हजार शंभर] खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२०४ विषय क्रमांक- ३१
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/४६/१० दि.१८/५/१०

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२६.४.२०१० ते २.५.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४६/२०१० दि.१८.५.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२०५ विषय क्रमांक- ३२
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/४७/१० दि.१८/५/१०

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.३.५.२०१० ते ९.५.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४७/२०१० दि.१८.५.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिकलेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक-११२०६ विषय क्रमांक- ३३
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- वाहन दुरुस्ती कार्यशाळा
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.सहशहर अभियंता यांचे जा.क्र.काशा/भां/कावि/१४३/१० दि.१५/५/१०

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

उद्यान विभागाचे वापराकरिता पी.सी.एम.टी./पी.एम.पी.एम.एल. यांचेकडून घेण्यात आलेले वाहन क्र.एम.टी.क्यू.८३८ डबलडेकर बस या वाहनाचा वापर दहा वर्षापेक्षा जास्त झाला असलेने आणि पी.सी.एम.टी./पी.एम.पी.एम.एल. यांच्याकडून सदर वाहन लिलावाने विक्री करणे ना हरकत दाखला प्राप्त झालेने उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पिंपरी चिंचवड ठरवून दिलेली किंमत अधिक व्हॅटची रक्कम मनपा कोषागरात भरून घेऊन स्वामिनी महिला बचत गट अखिल संघ, निगडी यांना सदर वाहन क्र.एम.टी.क्यू.८३८ डबलडेकर बस ताब्यात देण्यास मान्यता देणेत येत आहे. [र.रू.४०,००० अधिक व्हॅट १२.५ टक्के प्रमाणे र.रू.५,०००]

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२०७ विषय क्रमांक- ३४
दिनांक- २५.०५.२०१० विभाग- जकात
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जकात/६चि/कावि/३२८/१० दि.१८/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.बजाज ॲटो लि. विरूध्द पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्पे.सि.सुट क्र.९७३/२००२ चे मे.सिनीअर डिव्हिजन पुणे यांचे निकालावर मे.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केलेले अपिलावर सुनावणी होतेसमयी पुणे येथील मे.सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन यांनी दिलेल्या निकालाप्रमाणे र.रू. १९,९४,४२,८२२/- व त्यावर दि.२६/११/०९ पासून प्रत्यक्ष धनादेश देणेचे तारखेअखेर ६% दराने होणाऱ्या व्याज रकमेसह मे.न्यायालयात जमा करणेस व त्याचा खर्च अनामत परतावा या लेखाशिर्षकामधुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२०८ विषय क्रमांक- ३५
दिनांक- २५.०५.२०१० विभाग-पशुवैद्यकीय
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पवै/१/कावि/२९१/१० दि.१९/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा हद्दीतील मृत पाळीव प्राण्यांचे दफनभूमीचे कामकाजा करीता स्थानिक नोंदणीकृत अशासकीय संस्था मे.ॲनिमल हेल्थ ऑर्गनायजेशन, प्राधिकरण निगडी यांची एक वर्ष कालावधी करीता नेमणूक करणेस तसेच त्याचेशी करारनामा करून त्यांना र.रू.६,०००/- [र.रू.सहा हजार] प्रति माह अदा करणेस तसेच याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक-११२०९ विषय क्रमांक- ३६
दिनांक- २५.०५.२०१० विभाग-यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/अॅकड/कावि/१५१/१० दि.२०/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब्रिटीश लायब्ररी, पुणे यांना सन २०१०-११ सालाकरिता लायब्ररी फी र.रू.६,५००/-[र.रू.सहा हजार पाचशे] धनादेशा व्दारे अदा करणेकामी लायब्ररी या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीमधून खर्च करणे शक्य असल्याने सदरच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक- ११२१० विषय क्रमांक- ३७
दिनांक- २५.०५.२०१०
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ- मा.राजेंद्र साळुंके, मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव-

निगडी गावठाण कै.मधुकर पवळे उड्डाण पुलाखालील निगडी गावठाण परिसरामध्ये तीन व चार चाकी टेम्पो व्यवसाय करून उदरनिर्वाह करणारे छोटे व्यावसायिक संख्येने जास्त असल्यामुळे त्यांना त्याची वाहने पार्क करण्यासाठी जागा नसल्यामुळे कै.मधुकर पवळे उड्डाण पुलाखालील मनपाने ठेकेदाराला निश्चित केलेल्या दुचाकी वाहनतळाव्यतिरिक्त शिल्लक असणारी जागा छोटे तीन व चार चाकी टेम्पोसाठी विना मोबदला देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११२११ विषय क्रमांक- ३८
दिनांक- २५.०५.२०१०
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ- मा.राजेंद्र साळुंके, मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव-

ठराव क्र.१०९०३ दि.३०/३/२०१० नुसार मा.पक्षनेते यांस त्यांचे मागणीप्रमाणे महिन्द्रा लोगन हे वाहन (३१ मार्च पुर्वी उत्पादीत झालेले) खेरदी झाले असून पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमध्ये एप्रिल-२०१० नंतर युरो-III वाहने रजिस्ट्रेशन करणेस बंद केले आहे. फक्त युरो-IV वाहने रजिस्ट्रेशन केली जातात. हिन्दूस्तान मोटर्स लि. या कंपनीकडे अॅम्बेसीडर युरो-IV वाहन उपलब्ध नसलेने मा.विरोधी पक्षनेता यांचे कार्यालयीन कामकाजाचे वापरासाठी त्यांचे मागणीप्रमाणे घेता येणे शक्य होणार नाही मे.सिल्वर ज्युबिली मोटर्स लि. यांचेकडे युरो-IV वाहन उपलब्ध होणे शक्य आहे. त्यामुळे महिन्द्रा लोगन पेट्रोल (युरो-IV) वाहन खरेदी करता येणे शक्य आहे. तरी सदर मंजूर ठरावातील मजकूर मा.विरोधी पक्षनेता यांचेकरीता अॅम्बेसीडर ग्रॅड या

ऐवजी महिन्द्रा लोगन पेट्रोल अशी दुरुस्ती करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११२१२ विषय क्रमांक- ३९

दिनांक- २५.०५.२०१०

सुचक- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक- मा.एकनाथ थोरात

संदर्भ- मा.प्रेमकुमार नायर, मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव-

मनपाच्या वतीने दि.६ मे २०१० रोजी पिंपळेगुरव, पुणे-२७ या ठिकाणी सौ.धनश्री श्रीनिवासजी तळवलकर तथा दीदीजी यांचा भव्य नागरी सन्मान व मानपत्र प्रदान सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर समारंभासाठी चांदीचा कलश मे.रांका ज्वेलर्स, पिंपरी चिंचवड यांचेकडून थेट पध्दतीने र.रू. २६,३०४/- [र.रू.सव्वीस हजार तीनशे चार] खरेदी करण्यात आलेला असल्याने सदर झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११२१३ विषय क्रमांक- ४०

दिनांक- २५.०५.२०१०

सुचक- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक- मा.एकनाथ थोरात

संदर्भ- मा.प्रेमकुमार नायर, मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव-

मनपा सभागृहात राजर्षी शाहु महाराज, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले व भारतरत्न राजीव गांधी यांची तैलचित्रे बसविणेकामी महापालिका सभेने मान्यता दिलेली आहे. यापुर्वी मनपा सभागृहात बसविणेत आलेली तैलचित्रे श्री.विलास चोरमले, पोट्रेट आर्टिस्ट, पुणे यांचेकडून तयार करून बसविणेत आलेली आहेत. त्यांच्या कामाचा अनुभव पाहता सदरची चार तैलचित्रे ४ x ६१/२” फुट यासाईज मध्ये र.रू.९०,०००/- प्रती नग या दराने थेट पध्दतीने श्री.विलास चोरमले, पोट्रेट आर्टिस्ट, पुणे यांच्याकडून तयार करून घेण्यास व त्यासाठी एकूण येणाऱ्या र.रू.३,६०,०००/- [र.रू.तीन लाख साठ हजार] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११२१४ विषय क्रमांक- ४१

दिनांक- २५.०५.२०१०

सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.एकनाथ थोरात

संदर्भ- मा.राजेंद्र साळुंके, मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव-

मा.स्थायी समिती ठराव क्र.८८१ दि.५/६/२००७ रद्द करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११२१५ विषय क्रमांक- ४२
दिनांक- २५.०५.२०१०
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक- मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ- मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव-

मनपाच्या सन २०१०-११ चे अंदाजपत्रकात स्थापत्य क मुख्यालया मार्फत नाला ट्रेनिंग या लेखाशिर्षाखाली १)भोसरी वॉर्ड क्र.२२ मधील रामनगरी जवळील नाल्याचे बांधकाम करणे व २)भोसरी वॉर्ड क्र.२२ मधील फायर ब्रिगेड जवळील नाल्याचे बांधकाम करणे या दोन कामांना तरतूद करणेत आलेली आहे. परंतू सदर तरतूद खूपच कमी असल्याने किमान एक तरी काम काही प्रमाणात पुर्ण व्हावे यासाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११२१६ विषय क्रमांक- ४३
दिनांक- २५.०५.२०१०
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ- मा.राजेंद्र साळुंके, मा.एकनाथ थोरात यांचा प्रस्ताव-

राष्ट्रीय कार्यक्रमांसाठी घेतलेल्या वाहनाचा भाडेदर डिझेल दर वाढ लक्षात घेता प्रती दिनी ६००/- रूपये ऐवजी ९००/- रुपये दर मंजूर करण्यास व त्यानुसार बिले अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११२१७ विषय क्रमांक- ४४
दिनांक- २५.०५.२०१०
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.तानाजी खाडे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव-

मनपाच्या क्षेत्रामध्ये उर्दु प्राथमिक शाळेची संख्या १८ ते २० पर्यंत आहे. उर्दु माध्यमिक विद्यालयांची संख्या खूपच कमी असल्याने माध्यमिक विद्यालयात जाताना विद्यार्थ्यांना खूप दूर अंतरावर जावे लागते. स्थानिक नगरसेवकांची कासारवाडी येथे उर्दु माध्यमिक विद्यालय सुरू करणेकामी शिफारस आहे. तरी जाफरिया एज्युकेशन ट्रस्ट, पुणे यांच्यातर्फे उर्दु माध्यमिक विद्यालय सुरू करण्यास व तेथील उर्दू प्राथमिक

विद्यालयाच्या खोल्या मा.उपसंचालक नगररचना ठरवेल ते भाडे संस्थेने द्यावे, या अटीवर भाड्याने देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/०९/कावि/७२१/२०१०
दिनांक- २८/०५/२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.